# मुंबई विद्यापीठ

## विद्यापीठाच्या अधिसभेवर आणि विद्यापरिषदेवर अध्यापक निवडणूकांबाबतचे प्रकटन

या प्रकटनाद्वारे असे जाहिर करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम २८(२)(द)(r) नुसार अधिसभेवर १० महाविद्यालयीन अध्यापक तसेच कलम ३२(३)(छ)(g) नुसार विद्यापरिषदेवर ८ अध्यापक (प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधीत्व करणारे ०२ महाविद्यालयीन अध्यापक) यांच्या निवडणूकीसाठी तात्पुरत्या स्वरूपातील मतदार यादी प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर यादी विद्यापीठाच्या www.mu.ac.in/Election portal किंवा www.musenate.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच अवलोकनार्थ सहायक कुलसचिव, निवडणुक विभाग, रूम नं. ११०, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२ येथे उपलब्ध आहे.

### निवडणूक कार्यक्रम
### (अधिसभा आणि विद्यापरिषद)

| अ.न. | तपशील | | अंतिम दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १. | तात्पुरती मतदार यादी प्रसिद्धीची तारीख | : | २४ जानेवारी, २०१८ |
| २. | आक्षेप | : | २८ जानेवारी, २०१८<br>सायं. ५.०० वा. पर्यंत |
| ३. | दुरूस्त मतदार यादी | : | ३१ जानेवारी, २०१८ |
| ४. | कुलगुरूंकडे अपील | : | ४ फेब्रुवारी, २०१८<br>सायं. ५.०० वा. पर्यंत |

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ एकरूप परिनियम, २०१७ मधील परिनियम क्र. ८(४) नुसार मतदार यादीत आक्षेप असल्यास आवश्यक कागदपत्रासह सहायक कुलसचिव, निवडणूक विभाग, मुंबई विद्यापीठ, कक्ष क्र. ११०, पहिला मजला फोर्ट, मुंबई– ४०० ०३२ यांच्याकडे दिनांक २८ जानेवारी, २०१८ सायं. ५.०० वा. पर्यंत (नमुना – "A") सादर करावेत. याबाबतची संपूर्ण माहिती विद्यापीठाच्या उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

डॉ. दिनेश कांबळे
कुलसचिव तथा निवडणूक निणर्य अधिकारी

क्र. नि.वि./आयसीडी/२०१७-१८/ ५७१
दि. : २३ जानेवारी, २०१८

Scanned by CamScanner